# SPARK

Rotary Club of Poona Midtown

Rotary

CREATE HOPE in the WORLD


**Rtn. Minal Avachat**
President
9823081158

**Rtn. Smita Shah**
Secretary
9049860647

**Ann Manisha Kulkarni**
Editor
9422307038


Dist 3131 | Zone 05 | CC 15537
Year : 54 | Issue No.: 33 | Wed, 03 April 2024
For Private Circulation Only

We meet at Sevasadan School, Erandavane, at 7.30pm every Wednesday


**।। पर्यावरण संतुलनं अतीव आवश्यकम् ।।**

## आजची सभा

आज रिषभ ग्रुप तर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये लोकप्रिय आणि मिरची मुर्गा फेम आर जे राहुल हे आपल्याला प्रमुख पाहुणे लाभले आहेत.



**राहुल वाल्हेकर**

पुण्यातील मध्यम वर्गीय कुटुंबात जन्म झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड आणि मिश्किल स्वभाव ह्यामुळे विनोद किंवा हास्यरस जन्मतःच बहुधा राहुल घेऊन आला. पथनाट्य, नाटक या सगळ्यात जमेल तितका सहभाग होत असताना, आधुनिक रेडिओ या विषयाकडे वळण्याचा निर्णय घेतला आणि आज गेली १५ वर्ष तो आकाशवाणी निवेदक (RJ) हे काम प्रामाणिकपणे पार पाडतो आहे.

मिरची मुर्गा ही त्याची घराघरात पोचलेली ओळख. फोनवरून एखाद्या मुद्यात समोरच्याला खरं वाटेल अशा खोड्या (Prank) काढणे म्हणजेच मिरची मुर्गा आणि अशा खोडकर, उत्तम आवाज शैली यामुळे राहुल वाल्हेकर हा आवाज RJ Rahul म्हणून आपणास ज्ञात आहे.

**– रो. कपिल जोशी**

---

## रेडिओ का इतिहास

रेडिओ का आविष्कार १८९६ में इटली के वैज्ञानिक मार्कोनी ने किया। भारत में रेडिओ के जनक जगदीशचंद्र बोस थे। भारत में रेडिओ का प्रसारण १९२२ और १९२४ में एक निजी काम के स्वरूप शुरू हुआ। मुंबई, कोलकता और चेन्नई यहा तीन रेडिओ क्लब स्थापित किये गये। रेडिओ क्लबने जून १९२३ मे पहिला रेडिओ कार्यक्रम प्रसारित किया। १९३७ में इसका नामकरण 'ऑल इंडिया रेडिओ' किया गया।

१९५७ मे इसका नाम बदलकर 'आकाशवाणी' रखा गया। प्रारंभ में लोगों का ज्यादा ध्यान रेडिओ की तरफ नहीं गया। कोई इसके बारे में ज्यादा जानकारी नहीं रखता था। लोगोंको ज्यादा पसंद नहीं आता था। लेकीन कुछ साल पश्चात रेडिओ की पसंद बढने लगी। शुरू में इसको, समाचार प्रसारण का माध्यम माना जाता था।

धीरे धीरे इसे मनोरंजन की दृष्टी से देखा जाने लगा। गानों का प्रसारण, कथा कहानियाँ आदि के जरिये इसकी पॉप्युलॅरिटी बढने लगी। कई भाषाओं का प्रसारण भिन्न रूपों में होने लगा। धीरे धीरे रेडिओ हमारे जीवन का अभिन्न अंग बन गया, एक अहम हिस्सा बन गया। आज भलेही लोगों के पास मोबाईल फोन, कॉम्प्युटर आदि आ गया है, फिर भी ऑल इंडिया रेडिओ की पहचान कम नहीं हुई।

**– ॲन पूजा श्रीवास्तव**

## रेडिओ जॉकी

रेडिओजॉकी म्हणजेच आरजे हा लोकांशी प्रत्यक्षपणे संवाद रेडिओच्या माध्यमाने साधत असतो. श्रोत्यांना अधिकाधिक सहभागी करून त्यांना गुंतवून ठेवणे त्यासाठी तो गाणी ऐकवतो, विविधि क्षेत्रातली माहिती तसेच कधी गंभीर विषयांवर सखोल माहिती देऊन त्यावर संवाद साधणारा, चालू घडामोडींवर बोलणारा या चित्रपट सृष्टीवर बोलणारा किंवा लोकांशी त्यांच्या जीवनाबद्दल व समस्यांबद्दल बोलून ते जमेल तितके पर्याय शोधून काढणारा असतो. कधी थेट कार्यक्रम ठेवून तो लोकांशी सांवाद साधत असतो.

आरजे हा संगीतशैलीचा परिचय करून देणारा, टॉक रेडिओचे शो आयोजित करणारा, ऐकणाऱ्यांकडून कॉल घेऊन, त्यांच्याशी हसत–खेळत संवाद साधणारा, तसेच अतिथींची मुलाखत घेणारा, हवामान, खेळ, टिप्पणीरूपात बातम्या आणि रहदारी संबंधीची माहिती इत्यादी देणारा असतो.

आयुष्यात प्रत्येक क्षेत्र, यंत्रणा, प्रोसेस चालवण्यासाठी एक चालक नेमलेला असतो. तो त्या क्षेत्राला गती देतो, त्याच्या इच्छित स्थळी नेऊन पोचवतो. त्याच प्रमाणे सामान्य असामान्य आणि एकूणच सर्व लोकांच्या भावनांना, कामांना बाकी सर्वांपर्यंत रेडिओच्या माध्यमातून पोचवण्याकरता 'रेडियो जॉकी' ची गरज असते. गाण्यांमधला कलात्मक भाव आणि लोकांच्या मानवी भावना यांमधला एक मनोरंजक असा दुआ बनणारा व्यक्ति म्हणजे रेडियो जॉकी. आकाशवाणी निवेदकावरून रेडियो जॉकीची निर्मिती ही पूर्णपणे बदलत्या काळामुळे झाली असं म्हणायला हरकत नाही. या क्षेत्राला चिरतारुण्य 'रेडियो जॉकी' ने दिलं. गाणी ऐकवताना हवामान, बातम्या, आणि बटाटयाची लागवड यामुळे रेडियो आणि सामान्य लोक यांमधे झालेले ब्रेक अप "FM' च्या उदयामुळे आणि RJ च्या मैत्रीपूर्ण गप्पांमुळे पैच–अप मधे convert झाले.

रेडियो जॉकी–नावाप्रमाणे रेडिओवर स्वार होऊन शब्दांची घोडदौड करत असतो जो स्वैर न होता स्वतंत्रपणे आपले मत, विचार, मुद्दे, कला लोकापर्यंत गप्पांच्या मार्गाने पोचवत असतो. हा तो पोस्टमैन आहे जो एकाच्या भावना ओळखून, पत्र स्वतःच लिहून समोरच्याला पाठवतो. आजच्या तरुण पिढीला समर्पक आणि जुन्या पिढीच्या हृदयाचा तरुणपणा बाहेर काढू शकणारा अत्यंत तरबेज असा psychologist म्हणजे 'आर जे'. गाणी, चित्रपट, विनोद, सामाजिक घडामोडी बांधिलकी, खेळ, स्पर्धा, मनोरांजन यातले प्रत्येक विषय प्रत्येकाला सोपे करून सांगण्याची कला RJ ला अवगत असते. खुप गप्पा मारतो मग 'आर जे बन ना' यासारखे वाक्य प्रत्येक कट्ट्यांवर हमखास ऐकायला येतात. विनोद म्हणून ठीक आहे पण हे म्हणजे गाडी चालवता येते मग F1 रेसिंग मधे का नाही भाग घेत असं म्हणण्यासारखे आहे. खरे म्हणजे चांगले बोलता येणे ही या क्षेत्रातील मूलभूत गरज आहे. त्या सोबत उत्तम वाचन, निरीक्षण, अद्ययावत विचार, हजरजबाबीपणा, विनोदक्षमता, चालू घडामोडींचे ज्ञान गरजेचे असते आणि सर्वात महत्वाचे म्हणजे या सर्वांवर त्याचे स्वतःचे एक परिपक्व असे मत अत्यंत महत्वाचे ठरते.

RJ हा एक अनुभव आहे हुशार होण्याचा, खूप मित्र कमवण्याचा, कक्षा रूंदावण्याचा, संपर्क वाढवण्याचा आणि भाषणस्वातंत्र्याचा.

**– ॲन ज्योत्स्ना जाधव**

## मागील सभा : कलाकार कट्टा



दि. २७ मार्चला या वर्षातील तिसरा कलाकार कट्टा पार पडला. प्रसिद्ध लेखिका, दिग्दर्शिका आणि अभिनेत्री अशा त्रिगुण संपन्न प्रतिमा कुलकर्णी आणि मिलिमीटरचा सेंटीमीटर नव्हे कि.मी. प्रवास झालेला दुष्यंत वाघ असे दोन कलाकार आपल्याला पाहुणे म्हणून लाभले होते. त्यांच्या स्वागतासाठी श्री विराज याने फुलांच्या रांगोळ्या, रेड कार्पेट, कलाकारांचे फोटो यांचा उपयोग करून उत्तम सजावट केली होती. त्यामुळे वातावरण उत्साही झाले होते. नेहमी च्या रोटरी क्लब बिझीनेस नंतर रो. शुभदा जठार यांनी पाहुण्यांचा परिचय खूप छान करून दिला व सूत्रे रो. कपिल जोशी यांच्या कडे सोपवली. आणि सवाल जबाबाचा सिलसिला सुरू झाला.

प्रतिमाताईंची पहिली दिग्दर्शित मालिका 'प्रपंच' या विषयीचे अनुभव, आणि आता दुसऱ्या दिग्दर्शकांच्या हाताखाली काम करण्याचा अनुभव हे दोन्ही प्रतिमा ताईंनी उलगडून सांगितले. दुष्यंत वाघचा पहिला चित्रपट व त्यातील त्याची स्पास्टीक मुलांची भूमिका ते थ्री इडियट मधल्या आमिर खान बरोबरचा मिलीमीटर ते सेंटीमीटर वाला रोल हा प्रवास त्याने रंजकपणे सांगितला. मुलाखत संपल्यावर दोन्ही कलाकारांना मानपत्र प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

या मानपत्रामध्ये रो. कपिल ने रचलेल्या कवितेचा समावेश करण्यात आला होता. आभार प्रदर्शन ॲन अश्विनी पारखी यांनी केले. सर्व सभासदांनी कार्यक्रमाचा मनापासून आनंद घेतला.

**– रो. अरुणा शिकारखाने**

## प्रोजेक्ट रिपोर्ट



जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा कडूस नं १, तालुका खेड, जि. पुणे या शाळेला आपल्या क्लब तर्फे "E learning kit" देण्यात आले. १ एप्रिल रोजी शाळेमध्ये हा समारंभ पार पडला. रो. राजेश पारखी या शाळेमध्ये लहानपणी शिकले आहेत. या कार्यक्रमाला प्रे. मिनल, सेक्रेटरी स्मिता शहा रो. राजेश पारखी, व्हाइस प्रेसिडेंट रो. नितिन गद्रे उपस्थित होते.

## मला भावलेली रोटरी

रोटरीची मेंबर झाल्यापासून खूप छान वाटते आहे. आपल्याच कुटुंबातील सदस्य आहे. अशाच प्रकारे सगळेजण एकमेकांची काळजी घेतात. इथे सगळेजण एकमेकांना खूप मदत करतात. सगळ्या क्षेत्रातील मित्रमैत्रिणी मला इथे मिळाल्या व त्यांच्याकडून खूप काही छान शिकायला मिळाले. न बोलणाऱ्याला ही आपण काहीतरी बोलावे, करावे अशी भावना होते. आपल्या अंगातील कलागुण दाखवण्याची संधी मिळते.

रोटरीचे वातावरण खेळीमेळीचे राहण्यासाठी ट्रिपपण आयोजित केल्या जातात. त्यातूनही बऱ्याच प्रकारचे ज्ञानपण मिळते आणि करमणूकपण होतात याचा मला छान अनुभव आला आहे.

रोटरीमुळे आपल्यामध्ये समाज कार्य करण्याची शक्ती निर्माण होते. ती पण करण्याची संधी मला मिळाली. आपणही समाजातील गरजू लोकांच्या करता काहीतरी केले पाहिजे अशी जाणीव निर्माण होते.

प्रत्येकाचे वाढदिवस, लग्नाचे वाढदिवस, खूप छान प्रकारे साजरे केले जातात. रोटरीमध्ये कोणीही कोणत्याही क्षेत्रात प्रगती केली, नाव मिळवले की त्यांचा गौरव करत पुढे जाणाऱ्यांसाठी प्रोत्साहन दिले जाते.

रोटरीमुळे समाजातील अनेक स्तरावरील मोठमोठ्या मान्यवर प्रतिष्ठीत लोकांना भेटण्याची व त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची फार मोठी संधी मिळाली.

**– ॲन रूपाली बागुल**

Happy to share with you all that for the second consecutive year after Rushil Lohapatre, my student, **Kanak Satpute from Interact Club of Basic Tutorials,** Sponsored by **Rotary Club of Poona Midtown** will be going to Brazil under Rotary Youth Exchange programme.

**- Rtn Sameer Mohire**
Youth Director




## रेशीमगाठी

**३० मार्च :** रो. सुनील आणि ॲन शुभांगी हिंगमिरे

## जीवेत् शरदः शतम्

**३० मार्च :** रो. मिलिंद देशपांडे

**०१ एप्रिल :** रो. अमित जाधव

**०३ एप्रिल :** रो. सच्चिदानंद रानडे

## आगामी कार्यक्रम

**10th April : DG Visit**

**17rd April : Bawarchi Day**

**-: Bulletin Committee :-**

**Rtn Dr. Shubhada Jathar** Chairman | **Ann Sujata Keskar** Member | **Ann Seema Mhaskar** Member | **Ann Aarti Dengre** Member | **Rtn Rajeev Ghode** Member